Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

# भारतातील आरक्षण धोरणाचा इतिहास व सद्यस्थिती: एक दृष्टिक्षेप

**प्रा. निहाळ रामदास बाबाजी**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय,
बदनापुर ता. बदनापुर जि. जालना.

**प्रस्तावना :**

भारत हा एक जगातील लोकसंख्येच्या दृष्टीकोनातुन सगळयात मोठा लोकशाही देश आहे. भारतामध्ये स्वांतत्र्यानंतर अनेक विविधतता असुन देखील लोकशाही स्थिर स्वरुपात दिसून येते. याचे सर्व श्रेय भारतीय संविधानाला जाते. भारताच्या लोकशाही वाटचालीत अनेक अडथळे देखील आहे. राजकीय व्यवस्थेत काळाच्या प्रवाहात अनेक चांगले वाईट बदल देखील घडून आले. या बदलाबरोबरच आपल्या संसदीय लोकशाहीपुढे अनेक आव्हाने देखील निर्माण झाली. यामध्ये राजकारणाचे गुन्हेगारीकरण वाढले, भ्रष्टाचार मोठया प्रमाणात वाढला, स्वच्छ प्रतिमा, नैतिकतेची बुज राखणारे राजकारणी यांची कमतरता वाढली, वाढत जाणारा सिमेअंतर्गत व सिमेबाहेरील दहशतवाद निवडणुकांमध्ये धर्म, जातीचा शिरकाव, निवडणुकपध्दती दिवसेंदिवस खुपच खर्चिक बनत चालली. राजकारणातला सेवाभाव कमी होऊन सत्तालोलुपता वाढली. या सारखी कितीतरी आव्हाने आपल्यासमोर उभी आहेत. अशा अनेक आव्हांनापैकी आज आपल्या राजकीय व्यवस्थेपुढील एक आव्हान म्हणजे जातकेंद्रीत व समाजकेंद्रीत आरक्षण हा मुा होय.[१]

आरक्षण या घटकांचा भारतीय जनमाणसावर राजकीय व्यवस्थेवर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही दृष्टीने प्रभाव पडलेला दिसतो. भारतीय संविधानानुसार आरक्षणाचा मुख्य उेश हा समाजामध्ये सामाजिक, आर्थिक समता निर्माण करणे हा होता. भारतीय समाजात वर्णव्यवस्थेचे रुपातंर कालांतराने बंदिस्त जातीमध्ये निर्माण झाले, यामध्ये काही जाती या कनिष्ठ व अस्पृश्य ठरल्या गेल्या. या मागासलेल्या जातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांचे सामाजिक, आर्थिक मागासलेपण घालवण्यासाठी संविधानाने आरक्षणाचे धोरण स्विकारले. काळाच्या प्रवाहात एकेकाळी ज्या जाती या सधन गणल्या जात होत्या त्या मागासलेपणाकडे झुकायला लागल्या यासाठी त्यांची शेती आधारीत अर्थव्यवस्था, दुष्काळी परिस्थिती, शिक्षणाचा अभाव, आर्थिक दुबळेपण वाढत गेले. या दुबळेपणाला कमी करण्यासाठी शासनाने हातभार लावला पाहिजे अशी भावना या जातीची वाढत गेली.

आज भारतीय लोकशाही मध्ये अस्तिवात असलेल्या आरक्षणाचे पाळेमुळे १९०९ च्या मोर्लेमिन्टो सुधार कायदयात बघावयास मिळते. त्याचबरोबर १९३२ मध्ये ब्रिटिश पंतप्रधान रैम्स मैकडोन्लड यांनी ‘कम्युनल अवार्ड‘ नुसार अस्पृश्यांना काही अधिकार देण्यात आले. महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये १९३२ मध्ये जातीय आरक्षणावरुन पुणे करार देखील झाला होता. इ.स. १९२१ मध्ये मैसुरचे राजे कृष्णाराव वाडियार यांनी ब्राम्हणेत्तर लोकांसाठी सरकारी आरक्षण दिले होते.[२]

यानंतर तामिळनाडू राज्यामध्ये द्रविड कडंगम या संघटनेने शासनाकडे गैरब्राम्हण वर्गासाठी नोकऱ्यामध्ये आरक्षणाची मागणी केली होती. अशाच प्रकारची महाराष्ट्रात राजर्षी शाहूमहाराज यांनी १९०२ मध्ये आरक्षण व्यवस्था ब्राम्हणेत्तर समाजासाठी आरक्षण व्यवस्था लागू केली होती. भारतामध्ये संविधानाने कलम १५(४), १६(४), १७, १९(५), ३०, ४६, २७५, ३३०, ३३२, ३३३, ३३५, ३३६, ३३७, ३३८, ३४०, ३४१, ३४२, ३४७, ३५० यामध्ये आरक्षणा संदर्भात तरतुदी केलेल्या आहेत.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९५३ मध्ये केंद्रसरकारने काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय आयोग आरक्षणासाठी नियुक्त केला होता या आयोगाने भारतभर दौरे व अभ्यास करुन २३९९ जातींना मागासलेल्या जाती म्हणून दर्जा देवून घोषित केले होते. पंरतु काही दुर्देवी गोष्टींमुळे काकासाहेब कालेलकर आयोगाच्या शिफारशी केंद्रसरकारने लागू केल्या नव्हत्या.[३]

आरक्षण संदर्भात दुसरा आयोग हा मोरारजी देसाई यांच्या शासन काळात निर्माण करण्यात आला. या आयोगाचे अध्यक्ष बिहारचे माजी मुख्यमंत्री बिन्देश्वरी प्रसाद मंडल हे होते. या आयोगाने एकूण ३७४३ जातींना मागासलेल्या जाती म्हणून संबोधले. १९८० मध्ये या मंडल आयोगाने आपल्या शिफारसी सरकार समोर ठेवल्या. परंतु या काळात हा आयोग लागु करण्यात आला नाही. पण या आयोगाच्या शिफारशी चंद्रशेखरराव सरकारने सन १९९० मध्ये मंडल आयोग लागू केला. या सरकारने मागासलेल्या जातीसाठी २७% आरक्षणाची तरतुद केली. परंतु या आरक्षण धोरणांबाबत देशात अनेक ठिकाणी आंदोलने करण्यात आली. देशात अनेक ठिकाणी हिंसात्मक कार्यवाही देखील झाल्या. सर्वोच्च न्यायालयात या आरक्षणासंदर्भात अनेक याचिका दाखल झाल्या. पण सर्वोच्च न्यायालयाने १५ नोव्हेंबर १९९२ मध्ये सरकारने दिलेल्या आरक्षणाला योग्य ठरविले.[४]

**आरक्षणाची आवश्यकता :-**

एक न्यायपूर्ण निकोप समाजव्यवस्थेच्या विकासासाठी आरक्षणाची आवश्यकता आहे. जो समाज सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक व राजकीदृष्टया मागासलेला आहे अशा समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये आरक्षण आवश्यक आहे. समाजातील आरक्षणामूळे सर्व वर्गामध्ये शांततापुर्ण सामंजस्य निर्माण होते. आरक्षणामुळे सर्व वर्गातील लोकामध्ये प्रत्येक क्षेत्रात सहभाग वाढण्याचे प्रमाण वाढते. सामाजिकदृष्टया मागासलेल्या समाजाला आरक्षण दिल्यामुळे त्यांचा विकास आणि प्रगती होते तसेच त्यांच्यामुळे राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते. समाजातील मागासलेल्या वर्गामध्ये सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने जागृती घडवून आणली जाते. आरक्षणातुन राजकीय व सामाजिक संतूलन देखील कायम राहते.

**जात केंद्रित आरक्षण :-**

भारतामध्ये जात केंद्रित आरक्षण हे प्राचिन काळापासून अस्तित्वात राहत आले आहे. या आरक्षणामध्ये फरक हा एवढाच होता की, आरक्षण हे स्वातंत्र्यापुर्वी ब्राम्हण या जातवार घटकांकडे एकवटले होते. तर राज्यघटनेच्या अमंलबजावणी नंतर हे आरक्षण ब्राम्हणोत्तर वर्गाकडे एकवटले आहे. स्वातंत्र्यानंतर काकासाहेब कालेलकर आयोगाने २,३९९ जातींना आरक्षण देण्याचे सुचविले तर मंडळ आयोगाने ३७४३ जातींची आरक्षणासाठी शिफारस केली होती. यावरुन आपल्या लक्षात येते की, भारतात जातकेंद्रित आरक्षणाला महत्व आले आहे.[५]

**निवडणुका आणि आरक्षण :-**

निवडणुका आणि आरक्षण यांचा जवळचा संबंध आहे. आरक्षणाचा आधार घेतला तर मतपेटी सहज काबीज करता येते. असा राजकीय पक्षांचा दावा आहे. यासाठी आरक्षण या मु÷यावर सर्व राजकीय पक्ष आमदार खासदार यांचे एकमत होत असते. आरक्षण या घटकाला सर्वच राजकीय पदाधिकारी मुक सहमती देत असतात. आरक्षणामध्ये जसा फायदा आरक्षण समर्थक राजकीय पक्ष करुन घेतात. तशाच प्रकारे इतर राजकीय पक्ष आम्ही आरक्षण समर्थक कसे आहोत यांचा पाढा जनतेसमोर निवडणुकीच्यावेळी वाचत असतात. १९९० मध्ये व्ही.पी. सिंग सरकारने मंडळ आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचे ठरविले तेव्हा जनता पक्षाला बिहार, उत्तरप्रदेशमध्ये या आरक्षणाचा लाभ उठवता आला होता. म्हणजेच आरक्षण या धोरणाचा सरळ सरळ मतदार वर्तनावर प्रभाव पडत असतो.[६]

जात हा घटक भारतीय राजकारणात सतत कृतिशील राहत आलेला आहे. महाराष्ट्रातील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप व शिवसेना हे प्रमुख राजकीय पक्ष व या पक्षा व्यतिरिक्त इतर लहान राजकीय पक्ष देखील जात या घटकांच्या आधारे राजकीय संघटन करतात. बहुजन महासंघ या पक्षाने देखील 'पिछडे पावे, सौ मे साठ' या आधारे जातीचे राजकारण केले आहे. म्हणजे जात हा घटक त्यांच्या संघटनाचा मुख्य कणा होता. प्रत्येक राजकीय पक्ष केवळ जात या घटकांच्या भोवती राजकारण करत नाही, तर जात आणि भौतिक घटक यांचा मेळ राजकीय पक्ष घालतात. शेतकरी वर्गासाठी राजकारण करतांना शेती, पाणी, वीज, हमीभाव याचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला जातो, तर इतर जातींच्या संदर्भात त्यांच्याशी आरक्षणाची सांगड घातली जाते. म्हणजेच आरक्षणासंदर्भात जातीय राजकारण केले जाते. शासकीय सोयी-सुविधा देण्यासाठी जातीनुसार अनेक योजना राबविल्या जातात. म्हणजेच सरकारचे धोरण हे जातीय विषमता करणारे नसते. सरकार जातीय विषमता कमी करण्यासाठी प्रयत्नशील असते. या आरक्षणा संदर्भातील शासनाचा हेतू पूर्णत: राजकीय स्वरुपाचा दिसून येतो.

**भारतातील सद्यकालीन आरक्षण व्यवस्था व आरक्षण संदर्भातील सामाजिक आंदोलने**

केंद्रामध्ये शेडयुल्ड कास्ट (SC), शेडयुल्ड ट्राईबस (ST) आणि ऑदर बॅकवर्ड क्लास (OBC) अशा स्वरुपात आपणास केंद्रीय आरक्षण व्यवस्था आढळून येते. तसेच OBC मध्ये काही मुस्लिमांचा देखील समावेश होतो. प्रत्येक घटक राज्यानुसार ही आरक्षण व्यवस्था देखील वेगवेगळी दिसून येते. संसदेच्या ८४ जागासाठी (१५.४७%) SC साठी राखिव तर ST साठी ४७ जागा (८.६६%) राखिव जागा आहेत.[७]

**तक्ता क्र. १**

**महाराष्ट्राची आरक्षण व्यवस्था**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | आरक्षण | जाती |
|---|---|---|---|
| ०१ | अनुसुचित जाती -SC | १३.००% | ५९ जाती |
| ०२ | अनुसुचित जमाती -ST | ०७.००% | ४७ जमाती |
| ०३ | इतर मागास वर्गीय -OBC | १९.००% | ३४६ जाती |
| ०४ | विशेष मागास वर्गीय -SBC | ०२.००% | ०७ जाती |
| ०५ | व्हीजे.(भटक्या जमाती) -VJA | ०३.००% | १४ जमाती |
| ०६ | भटक्या -NTB | ०२.५०% | २८+०७ जमाती |
| ०७ | NTC | ०३.५०% | ०१ जात |
| ०८ | वंजारी -ND-D | ०२.००% | ०२ जात |
| | **एकूण आरक्षण** | **५२.००%** | |

**राजस्थानमधील गुज्जर आंदोलन :-**

राजस्थान या राज्यामध्ये गुज्जर समाजाच्या आरक्षणासाठी २००८ पासून आंदोलन चालु आहे. या समाजाने १३ मे २००८ ते १७ जुन २००८ मध्ये आरक्षणासाठी आंदोलन केले. तर दुसरे आंदोलन २०११ मध्ये घडले. या गुज्जर समाजाच्या आंदोलनामध्ये ३७ जण मृत्युमुखी पडले तर ७०० व्यक्ती या जखमी झाल्या. या समाजाला OBC कोटयामधून आरक्षण हवे होते. यासाठी यांनी राजस्थानमधील भारतपुर, घोलपूर, सवाई माधवराव इ. अनेक जिल्हयात आक्रमक आंदोलने घडून आणली, अनेक ठिकाणी संपत्तीची नासधुस केली. सरकारी बस, इमारती जाळून टाकल्या. या आंदोलनाला दडपण्यासाठी राजस्थान पोलिस व भारतीय सैन्याला देखील या आंदोलनाविरुध्द कारवाई करावी लागली.[८]

**गुजरातमधील पटेल समाजाचे आंदोलने :-**

गुजरातमधील पटेल समाजाने देखील आपल्याला नोकरीमध्ये आरक्षण मिळावे यासाठी शासनावर २०१५-२०१६ मध्ये आंदोलन करुन शासनावर दबाव वाढविला. या समाजाला १०% शैक्षणिक आरक्षण मिळावे, अशी त्यांची इच्छा आहे. यासाठी २२ वर्षीय हार्दिक पटेल या तरुणाने या समाजाच्या आंदोलनाचे नेतृत्व केले.

**महाराष्ट्रामधील मराठा व मुस्लिम समाजाचे आंदोलने :-**

महाराष्ट्रामध्ये मराठा समाज हा संख्येने खुप मोठा आहे. या समाजात १० ते २०% श्रीमंत आहे. तर ७० ते ८०% समाज हा अत्यंत हालाखीचे जीवन जगत आहे. राज्यात, विदर्भात आणि पश्चिम महाराष्ट्रात मराठा समाजाला कुणबी या इतर मागासवर्गात येणाऱ्या जातीचे दाखले दिले जातात. पण मराठवाडयात मात्र कुणबी म्हणून मराठयांना गणले जात नाही. राज्यकर्ता जमात म्हणून ओळखला गेलेला समाज मोठेपणात गरीब कधी झाला हे कळालेच नाही. आता मात्र या समाजाला आरक्षणाची गरज भासू लागली व या समाजाने आंदोलनाच्या मार्गाने जाण्याचे ठरविले, मराठा समाजाच्या आरक्षणाचे खरे विरोधक मराठा समाजातील नेते हेच आहेत.[९]

सन २०१४ मध्ये काँग्रेस सरकारने माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांच्या नेतृत्वाखाली आरक्षणासाठी समिती निर्माण केली. या समितीने मराठयांची मागासलेपणाची पुरावे सादर करुन आरक्षण देणे योग्य आहे, अशी शिफारस महाराष्ट्र शासनाला केली होती. काँग्रेस सरकारने मराठा व मुस्लिम या दोन्ही समाजासाठी आरक्षण लागू केले. परंतू या आरक्षणाला उच्च न्यायालयाने तात्पुरत्या स्वरुपात बंदी आणली याचे कारण म्हणजे महाराष्ट्रात ५२% आरक्षण देणे घटनाविरोधी मानले. पण २००४ मध्ये केंद्र सरकारच्या वतीने आरक्षणाबाबत अभ्यास करण्यासाठी खा. नचीअप्पन समितीची निर्मिती केली. या समितीने २००५ मध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटविण्याची शिफारस केली आहे. शिफारस जर मंजूर झाली तर मराठा समाजापुढील आरक्षणाचा मार्ग मोकळा होणार आहे.

२०१६ मध्ये मराठा समाजाने महाराष्ट्रात 'मराठा क्रांती मोर्चाची' स्थापना केली. या मोर्चाच्या अनेक मागण्यांपैकी मराठा आरक्षण मिळावे ही प्रमुख मागणी आहे. यासाठी निमित्त घडले फक्त कोपर्डी घटना कोपर्डी घटनेच्या पार्श्वभुमीवर या समाजाने राज्याच्या प्रत्येक जिल्हयात, तालुक्यात, गावांमध्ये मराठा क्रांती मुक मोर्चे काढले. व आरक्षणासाठी शासनावर दबाव वाढविला आहे. या मराठा क्रांती मुक मोर्चाला मुस्लिम समाजाने आपला जाहीर पाठिंबा दिला आहे.या मोर्चाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील झाली.[१०]

मराठा समाजाबरोबरच किंबहूना अगोदर मुस्लिम समाजाचे आरक्षणासाठी महाराष्ट्रात तीव्र आंदोलने होत आहेत. मराठा आरक्षणातील आंदोलनाचा या समाजातील नेत्यावर प्रभाव पडला. त्यांनी देखील शांततेच्या मार्गाने आंदोलने केलेली आपणांस दिसून येतात. या समाजाचा विकासाचा प्रश्न देखील मोठा आहे. मुस्लिम समाजाच्या मागासलेपणाची चर्चा नेहमी होत असते. या समाजाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना राजकीय वाटा मिळत नाही. या शैक्षणिक, आर्थिक मागासलेपण देखील मोठे आहे. काँग्रेस सरकारने २०१४ मध्ये या समाजाला ५% शासकीय नोकऱ्यात आरक्षण दिले पण न्यायालयात देखील या आरक्षणाचा टिकाव लागला नाही. भारताच्या इतर राज्यात केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, आंध्रप्रदेश या ठिकाणी मुस्लिमांना आरक्षण मिळाले आहे. पण महाराष्ट्रात या समाजाचे आंदोलन अजुनही चालुच आहे. मुस्लिम समाजातील शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण, मुस्लिम जमातवाद, हिंदू जमातवाद व दहशतवाद यांच्या प्रभावामुळे मुस्लिम समाज हा अधिकच पेचात सापडलेला आहे. साहजिकच मागासलेल्या दुर्बल जाती व समाजाला आरक्षण देऊन त्यांना प्रगतीच्या विकासाच्या वाटेवर आणण्याचे काम हे शासनाचे असते. जो राजकीय पक्ष किंवा सत्ताधारी शासन ज्या समाजाला आरक्षण व भौतिक सुविधा पुरवितात त्यांच्या पाठीमागे हा

समाज जात असतो. तर आरक्षणामुळे दुखावलेला समाज हा दुर जात असतो. [११] महाराष्ट्रामध्ये मराठा समाजासाठी मिळालेले एसईबीसी आरक्षण सुप्रिम कोर्टाच्या आदेशान्वये र करण्यात आले. यानंतर श्री. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली जालना जिल्हयातील अंतरवाली सराटी येथे आंदोलन सुरू केले.

**तक्ता क्र. २**

**भारतातील राज्यनिहाय आरक्षण (टक्केवारीत)**

| अ.क्र. | राज्य | खुला | ओबीसी | एस.सी. | एसटी | इतर |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | आंध्रप्रदेश | १६ | ५९ | १८ | ०७ | ०० |
| २. | अरुणाचल प्रदेश | १५ | ०५ | ०६ | ७२ | ०२ |
| ३ | आसाम | २० | ५२ | १३ | १० | ०५ |
| ४ | बिहार | १२ | ६९ | १९ | ०१ | ०० |
| ५ | छत्तीसगढ | ११ | ४५ | १४ | ३० | ०० |
| ६ | दिल्ली | ५७ | २४ | १७ | ०१ | ०१ |
| ७ | गोवा | ८० | ०७ | ०५ | ०५ | ०३ |
| ८ | गुजरात | २५ | ४९ | १५ | ११ | ०० |
| ९ | हिमाचल प्रदेश | ३१ | ४४ | २० | ०५ | ०० |
| १० | हरियाणा | २२ | ५३ | २५ | ०० | ०० |
| ११ | जम्मु काश्मिर | ७८ | ०५ | ०८ | ०९ | ०० |
| १२ | झारखंड | १६ | ४५ | ११ | २८ | ०० |
| १३ | कर्नाटक | १८ | ५४ | १५ | ०६ | ०७ |
| १४ | केरळ | ३६ | ५९ | ११ | ०२ | ०० |
| १५ | मध्यप्रदेश | २१ | ४० | १८ | २१ | ०० |
| १६ | महाराष्ट्र | ४८ | ३२ | १३ | ०७ | ०० |
| १७ | मणिपुर | २५ | १२ | ०७ | ५६ | ०० |
| १८ | मेघालय | ०९ | ०३ | ०७ | ८१ | ०० |
| १९ | मिझोरम | ०३ | ०१ | ०१ | ९५ | ०० |
| २० | नागालँड | ०८ | १४ | ०५ | ७३ | ०० |
| २१ | ओरिसा | २० | ३७ | २० | २३ | ०० |
| २२ | पंजाब | ४८ | १० | ४९ | ०० | ०० |
| २३ | राजस्थान | २० | ४७ | १९ | १४ | ०० |
| २४ | सिक्कीम | १४ | ४१ | ०९ | ३६ | ०० |
| २५ | तामिळनाडू | १३ | ६७ | १९ | ०१ | ०० |
| २६ | त्रिपुरा | १९ | २१ | २३ | ३७ | ०० |
| २७ | उत्तराखंड | २२ | ५५ | २१ | ०३ | ०० |
| २८ | उत्तरप्रदेश | १४ | ६० | २५ | ०१ | ०० |
| २९ | पश्चिम बंगाल | १४ | ४७ | २२ | ०६ | ०० |

((दै. लोकमत औरंगाबाद गुरुवार २६ जुन २०१४)

**समारोप :**

मतदार वर्तनावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांचा अभ्यास केल्यानतंर आपणास असे लक्षात येते की, मतदार वर्तनावर काही घटकांचा सकारात्मक व नकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो. तर काही घटक सकारात्मक व नकारात्मक दोन्ही दृष्टीने देखील मतदार वर्तनावर प्रभाव पाडत असतात.

**संदर्भ -**

१) गजराज पदमसिंह., भारतीय राजनिती (२०१४). दिल्ली : अर्जुन पब्लिशिंग हाऊस. पृष्ठ क्र. २०२.
२) कित्ता. पृष्ठा क्र. २०४
३) Guggar agitation in Rajastan. www.https:wikipedia .org
४) दै. लोकमत. गुरुवार २६ जून २०१४. पान क्र. ०७.
५) www.Maratha Kranti Morcha, २०१६.
६) दै. लोकमत. गुरुवार २६ जून २०१४.
७) दै. लोकसत्ता अर्थवेध., गुरुवार १० जुलै २०१४.पृष्ठ क्र. ०९.
८) Paul R. Brass. Religion, Language and Politics in North India. (New Delhi, १९७५).page No. ३७४-७५
९) संपादक, चोरमारे विजय. महाराष्ट्राचे राजकारण (२०१४). मुंबई : नवता प्रकाशन. पृष्ठ क्र.७९.
१०) संपादक, पळशीकर सुहास., सत्ता संघर्ष (२००७). पुणे : समकालीन प्रकाशन. पृष्ठ क्र. १०१-१०२.